महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२

क्रमांक : पशियो:२०२६/प्र.क्र.२४/शिक्षण-१ दिनांक :१३ मे २०२६.

प्रती,
आयुक्त,
समाजकल्याण,
पुणे

**विषय :** परदेश शिष्यवृत्ती योजना सन २०२६-२७ जाहिरातीस मुदतवाढ देणेबाबत.

**संदर्भ :** १. आपले पत्र क्र. सकआ/शिक्षण/परदेश शिष्यवृत्ती/जाहिरात/२०२६-२७/८३४ पुणे, दिनांक ०५.०३.२०२६.
२. या कार्यासनाचे समक्रमांकाचे दिनांक १८.०३.२०२६ रोजीचे पत्र
३. आपले पत्र क्र. सकआ/पशियो/जाहिरात२६-२७/मुदतवाढ/२०२६-२७/का-४ई/१८७८ पुणे, दिनांक १२.०५.२०२६.

महोदया,

कृपया उपरोक्त संदर्भाधीन पत्रांचे अवलोकन व्हावे.

२. राजर्षी शाहु महाराज परदेश शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०२६-२७ या वर्षाकरीता ७५ विद्यार्थ्यांची निवड करण्याकरिता वृत्तपत्रात तसेच शासनाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

३. आपल्या संदर्भाधीन पत्र क्र. ३ अन्वये शासनास सदर जाहीरातीचा मुदतवाढीचा प्रस्ताव शासनास प्राप्त आहे. त्यानुषंगाने सदर प्रस्तावाचे अवलोकन केले असता सदर योजनेचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना लाभ घेता यावा याकरीता अर्ज दाखल करण्याचा कालावधी वाढविण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्याकरिता दिनांक १५ जून, २०२६ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत असून, त्यानुसार विहीत वेळेत कार्यवाही करावी.

(वर्षा देशमुख)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:- निवडनस्ती

C:\Users\sandeepa.jadhav\Desktop\pragati data\परदेश शिष्यवृत्ती 2026-27\पशियो-2026-27 जाहिरात मसुदयास मंजूरी..docx

Scanned with AltaScanner